महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांकः कअनि १११९/प्र.क्र.७/१४ब
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: १ ऑगस्ट, २०१९

वाचा : १) समक्रमांकाचे दिनांक १२.०६.२०१९ रोजीचे आदेश.
२) समक्रमांकाचे दिनांक २२.०७.२०१९ रोजीचे आदेश.

आदेश

संदर्भाधीन क्र.१ येथील आदेशान्वये श्री.नि.शं.क्षीरसागर, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांची महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) व ४(५) अनुसार शालेय शिक्षण व क्रिडा विभागामध्ये बदली करण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन क्र.२ येथील आदेशान्वये श्री.क्षीरसागर यांना बदलीच्या विभागात रुजू होण्यासाठी दिनांक २२.०७.२०१९ (म.नं) पासून एकतर्फी कार्यमुक्त करण्यात आले आहे.

२. प्रस्तुत आदेशाद्वारे संदर्भाधीन क्र.१ येथील दिनांक १२.०६.२०१९ रोजीच्या आदेशान्वये श्री.नि.शं.क्षीरसागर, कक्ष अधिकारी यांची शालेय शिक्षण व क्रिडा विभागामध्ये केलेली बदली प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात येत आहे. तसेच, संदर्भाधीन क्र.२ येथील दिनांक २२.०७.२०१९ रोजीच्या आदेशातील श्री.नि.शं.क्षीरसागर, कक्ष अधिकारी (अ.क्र.२९) यांचे एकतर्फी कार्यमुक्ततेचे आदेश प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात येत आहेत. प्रस्तुत आदेशास अनुसरुन श्री.नि.शं.क्षीरसागर, कक्ष अधिकारी यांनी इतर कोणत्याही आदेशाची प्रतिक्षा न करता उच्च व तंत्रशिक्षण विभागात तत्काळ रुजू व्हावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०२१४५६५७०८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.08.02 15:06:41 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री.नि.शं.क्षीरसागर, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

प्रत,

१. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२. अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, संबंधित मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
३. सह/ उप सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
४. आहरण व संवितरण अधिकारी, संबंधित मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. निवडनस्ती (कार्यासन १४-ब)